माहिती हवीय?

सुरेश मगझम, कोल्हापूर.

□ *उलझन, सीआयडी, पापी-सबूत, सगीना, किस्मत, तुम्हारे लिए, शुभ दिन, चायना टाऊन, आत्माराम* हे चित्रपट केव्हा पडद्यावर आले? त्यांचे नायक-नायिका कोण? निर्माता-दिग्दर्शक कोण?

— *उलझन* १९६९ला पडद्यावर आला होता. निर्माता सुदेशकुमार, दिग्दर्शक रघुनाथ झालानी, नायक-नायिका संजीवकुमार-सुलक्षणा पंडित.

सीआयडी या नावचा चित्रपट दोन वेळा पडद्यावर आलाय. १९५६ला पहिला *सीआयडी* आला होता. निर्माता गुरुदत्त, दिग्दर्शक राज खोसला, नायक-नायिका देव आनंद-शकीला. १९९०ला दुसरा *सीआयडी* आला होता. निर्माता कमल सदनाह, दिग्दर्शक अजय गोयल, नायक-नायिका विनोद खन्ना-अमृता सिंह.

पापी नावाचे तीन चित्रपट आतापर्यंत पडद्यावर आले आहेत. १९४३ला पहिला *पापी* आला. निर्माता बात्रा प्रॉडक्शन, दिग्दर्शक मजनू, नायक-नायिका सतीश व माधुरी. १९५३ला दुसरा *पापी* आला. निर्माते रणजीत मुव्हीटोन, दिग्दर्शक चंदू लालशहा, नायक-नायिका राज कपूर व नरगीस. १९७७ला तिसरा *पापी* आला. निर्माता दिग्दर्शक ओ. पी. रल्हन, नायक-नायिका सुनील दत्त-रीना रॉय-झीनत अमान.

सबूत १९८०ला पडद्यावर आला होता. निर्माता राज बावेजा व जी. एच. नवानी, दिग्दर्शक तुलसी रामसे व श्याम रामसे, नायक-नायिका नविन निश्चल व काजल किरण.

सगीना १९७४ला पडद्यावर आला होता. निर्माता जे. के. कपूर, दिग्दर्शक तपन सिन्हा, नायक-नायिका दिलीपकुमार-सायराबानू.

किस्मत या नावचा चित्रपट आतापर्यंत सहावेळा आलाय. पहिला *किस्मत* १९३२ला आला आणि तो मूकपट होता. निर्माता महाराष्ट्र फिल्म कंपनी, दिग्दर्शक बाबूराव पटेल, नायक-नायिका रामचंद्र वर्दे-सुनीता. दुसरा *किस्मत* १९४३ला आला. निर्माता बॉम्बे टॉकीज, दिग्दर्शक ग्यान मुखर्जी, नायक-नायिका अशोककुमार-मुमताज शांती. तिसरा *किस्मत* १९५६ला आला. निर्माता स्टारलॅब प्रॉडक्शन, दिग्दर्शक नानाभाई भट्ट, नायक-नायिका रंजन व पीस कंवल. चौथा *किस्मत* १९६८ला आला. निर्माता प्राईड ऑफ एशिया फिल्म्स, दिग्दर्शक मनमोहन देसाई, नायक-नायिका विश्वजीत व बबिता. पाचवा *किस्मत* १९८०ला आला. निर्माता यश कोहली, दिग्दर्शक भीष्म कोहली, नायक-नायिका मिथुन चक्रवर्ती-रंजीता. सहावा *किस्मत* १९९५ला आला. निर्माता-दिग्दर्शक हरमेश मल्होत्रा, नायक-नायिका गोविंदा व ममता कुलकर्णी.

तुम्हारे लिए १९७८ला आला. निर्माता राज तिलक, दिग्दर्शक बासू चटर्जी, नायक-नायिका संजीवकुमार-विद्या सिन्हा.

शुभ दिन १९७४ला आला. निर्माता एम. एम. ए. चिन्नाप्पा देवर, दिग्दर्शक एच. त्यागराजन, नायक-नायिका, राजेश लेहर व मधू चंद्रा.

चायना टाऊन १९६३ला आला. निर्माता-दिग्दर्शक शक्ती सामंता, नायक-नायिका शम्मी कपूर व शकीला.

आत्माराम १९७९ला आला. निर्माता-दिग्दर्शक सोहनलाल कंवर, नायक-नायिका शत्रुघ्न सिन्हा-विद्या सिन्हा.

नारायण फातर्पेकर, बांबोलीम.

□ अमिताभ बच्चन आणि अमजद खान यांचा पहिला आणि शेवटचा चित्रपट कोणता?



***हिंदुस्तान की कसम* अमजद खानचा पहिला चित्रपट असला तरी त्याला खरी लोकप्रियता मिळवून दिली ती *शोले*तल्या गब्बरसिंगनेच.**

— अमिताभचा पहिला चित्रपट *सात हिंदुस्तानी* व आजमितीस शेवटचा चित्रपट *अरमान*. अमजद खानचा पहिला चित्रपट *चार पैसे*. या चित्रपटात तो बाल कलाकार होता. तरुणपणी त्याने भूमिका केलेला पहिला चित्रपट *हिंदुस्तान की कसम* आणि शेवटचा चित्रपट *कौन कितने पानी में*.

उमेश सुर्वे, तुळजापूर.

□ हास्य अभिनेता मारुती कोणकोणत्या चित्रपटात चमकला?

— मारुतीने अगणित चित्रपटात भूमिका केलेल्या असल्यामुळे त्या सर्वांची यादी येथे देता येणे शक्य नाही. एक्स्ट्रा म्हणून आपल्या रुपेरी जीवनाची सुरुवात त्याने केली. *पहली तारीख*मधील 'खूश है जमाना आज पहली तारीख है...' हे किशोरकुमारचं गाणं पडद्यावर त्याच्या तोंडी होतं. या गाण्यामुळे तो लोकांना माहीत झाला आणि त्यानंतर अनेक चित्रपटात त्याने लहानसहान भूमिका केल्या. *क्या यह बंबई है* या चित्रपटात तर तो निशीबरोबर नायकाच्या भूमिकेत चमकला होता. त्याने नायकाची भूमिका केलेला हा एकमात्र चित्रपट. *किलर्स, हम सब चोर हैं* अर्थात *द क्रिमिनल्स, बागी, शहजादा, मंगूदादा* यासारख्या दोन चार चित्रपटांचं दिग्दर्शन देखील त्याने केलं.

सी. बी. बोरकर, उल्हासनगर.

□ मा. रोमी, बबलू, सुशीलकुमार, मा. अलंकार, आकाशदीप हे बालकलाकार सध्या काय करतात?

— मा. रोमी आज काय करतोय माहीत नाही. बालकलाकार म्हणून त्याची सद्दी संपल्यावर तो दिग्दर्शक रमेश सिप्पी यांच्याकडे सहाय्यक म्हणून काम करायचा. बबलू विषयी काही माहिती नाही. सुशीलकुमार एअर इंडियात नोकरी करीत होता. आता तो रिटायर झाला असेल. अलंकार परदेशात आहे. आकाशदीप टीव्ही मालिकांत दिसतो.

भरत कालुवाला, माहीम.

□ 'मैंने तुझे मांगा, तुझे पाया...' हे लता आणि किशोर यांनी गायलेलं गाणं कोणत्या चित्रपटातील?आहे? या चित्रपटातील प्रमुख कलाकार कोण?

— 'मैंने तुझे मांगा, तुझे पाया...' हे गाणं लता आणि किशोर यांनी नव्हे तर आशा आणि किशोर यांनी गायलं होतं आणि ते १९७५च्या *दीवार* या चित्रपटात होतं. अमिताभ बच्चन, शशी कपूर, परवीन बाबी, नीतू सिंग, निरुपा रॉय, मनमोहन कृष्ण, मदनपुरी, सत्येन कप्पू, इफ्तेकार या चित्रपटातील प्रमुख कलाकार होते.